४१

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ११५/प्रनिप्रा/ ८२१३ अ        दिनांक : ३०/३/२२

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, **दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ४४ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. , ४) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ५) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, ६) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) श्री. राजेंद्र लोंढे, विशेष कार्य अधिकारी, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामारईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, वैद्यकीय/आयुष विभाग, राज्य सामारईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | २१/०३/२०२२ | दुपारी १२:०० वा. | तंत्र शिक्षण | पदवी अभियांत्रिकी / तंत्रज्ञान व वास्तूकलाशास्त्र |

(जे.पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य
३०/३/२२

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक बैठक-१८२२/प्र.क्र.१०३/प्रनिप्रा/४४९, दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाची ४४ क्रमांकाची बैठक दिनांक २१ मार्च २०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी अभियांत्रिकी / तंत्रज्ञान आणि वास्तूकलाशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. या संदर्भात तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांची क्रमांक २अ/एडीएम/२०२२/६२, दिनांक २१/०२/२०२२ व २अ/एडीएम/२०२२/६३, दिनांक २१/०२/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी आयोजित केलेल्या प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ (बैठक क्रमांक ४४) , २२/०३/२०२२ (बैठक क्रमांक ४५), २३/०३/२०२२ (बैठक क्रमांक ४६), २४/०३/२०२२ (बैठक क्रमांक ४७) व २५/०३/२०२२ (बैठक क्रमांक ४८) पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

**(क) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींबाबंत.**

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रकरणी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी केलेली कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे **(प्रपत्र – अ)**

**(ख) नव्याने मान्यता प्राप्त भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, पुणे या विनाअनुदानित संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विद्यार्थी प्रवेशाबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, पुणे या नव्याने मान्यता प्राप्त महाविद्यालयास संबंधीत प्राधिकरणांची मान्यता प्राप्त झालेली आहे, परंतू महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण अद्याप प्राप्त झालेले नाही. या संदर्भात संबंधीत महाविद्यालयाच्या प्रवेश प्रकरणी इच्छूक उमेदवारांकडून पंसतीअर्ज (Preference Form) भरुन घेण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान केली आहे.

**(ग) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक.**

आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्त्र अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षांचे संभाव्य वेळापत्रक प्राधिकरणास सादर केले. सदरील वेळापत्रकास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(प्रपत्र – ब)**

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(घ) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता नोदणी केलेल्या परंतू प्रत्यक्षात परिक्षेस न बसलेल्या व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी न झालेल्या उमेदवांराच्या संख्येबाबत संबंधीत सेवा पुरवठादारांना देण्यात येणाऱ्या देयकातील दराच्या ५०% दराने रक्कम आवश्यक ती तपासणी/छाननी करुन अदा करण्याचे निर्देश देण्यात आले.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 30/3/22